# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

जा.क्र.२०२०/आरबी-१/डेस्क२/टे-४/crpc-१४४/प्र.क्र.- १३ दिनांक. ०५.०५.२०२१

वाचाः-
१) साथरोग प्रतिबंध कायदा १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र.करोना/२०२०/ प्र.क्र.५८ /आरोग्य-५ दिनांक १४ मार्च २०२०.
४. मा.आयुक्त(कृषी), कृषि आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्रं.गुनियो/गनि:७/८/कोविड/१४५०७/ २०२१, दिनांक २७.०४.२०२१.
५. या कार्यालयाचे समक्रमांकीत फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश, दि. ३०.०४.२०२१.

**विषयः** कोविड-१९ ब्रेक द चेन निर्बंध कालावधीमध्ये कृषि विषयक कार्यामध्ये समन्वय व बियाणे, खते, किटकनाशके व कृषि साहित्यांचा अडथळारहित पुरवठा बाबत.

**आदेश**

ज्याअर्थी, आपत्ती व्यवस्थापन २००५ मधील कलम २५ अन्वये जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली आहे व त्यातील पोट कलम २ (अ) नुसार जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी हे उक्त प्राधिकरणाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूचा (कोविड-१९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी महाराष्ट्र राज्यात साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ दिनांक १९/०३/२०२० पासून लागू करून खंड २, ३ व ४ मधील तरतुदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाने कोरोना विषाणूने (कविड-१९) उद्भवणाऱ्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रणासाठी महाराष्ट्र कोविड-१९ उपाययोजना नियम २०२० यातील नियम ३ नुसार सक्षम प्राधिकारी म्हणून जिल्हाधिकारी यांना घोषित केलेले व त्यांना कविड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहेत त्या करण्यासाठी ते सक्षम असतील असे जाहीर केले आहे.

ज्याअथी, मा.आयुक्त(कृषी), कृषि आयुक्तालय, पुणे यांनी संदर्भ क्र.४ अन्वये दिनांक २७/०४/२०२१ च्या आदेशातील अत्यावश्यक श्रेणीमध्ये शेती संबंधी कार्य / उपक्रम, बियाणे, खते, उपकरणे व त्याची दुरुस्ती यासह कृषि क्षेत्राचे अखंडीत सातत्य सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असणारी कृषि संबंधीत कार्य आणि त्याशी संबंधित सर्व सेवांचा समावेश आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र.४ अन्वये कोविड-१९ ब्रेक द चेन निर्बंध कालावधीमध्ये शेती संबंधी कार्य / उपक्रम, बियाणे, खते, उपकरणे व त्याची दुरुस्ती यासह कृषि क्षेत्राचे अखंडीत सातत्य सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक असणारी कृषि संबंधीत कार्य आणि त्याशी संबंधीत सर्व सेवा यांच्या कार्यवेळेबाबत निर्णय घेण्याबाबत मा.आयुक्त (कृषि) यांनी कळविले आहे.

त्याअर्थी, मी डॉ.विपीन इटनकर(भा.प्र.से.), जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, नांदेड याद्वारे असे आदेशीत करीत आहे की **नांदेड जिल्हयातील शेती विषयक सेवांशी निगडीत असलेले कृषि सेवा केंद्र जसे बियाणे, खते, किटकनाशके, कृषि साहित्य विक्री दुकाने यांच्याशी निगडीत विक्री साठवणूक व वाहतूक सकाळी ७.०० ते सायंकाळी ७.०० वाजेपर्यंत** सुरू ठेवण्यास या आदेशान्वये परवानगी देण्यात येत आहे.

## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय,नांदेड.

पत्ता :गांधी पुतळयाजवळ,स्टेशन रोड नांदेड. फोन- ०२४६२-२३७१०१, Email :nandedrdc@gmail.com

तथापी, कोविंड-१९ संदर्भातील सर्व मार्गदर्शक तत्वाचे तंतोतंत पालन करणे सर्व संबंधीतांना बंधनकारक राहील.

सदर आदेशाची कोणतीही व्यक्ती, संस्था किंवा संघटना यांनी अंमलवजावणी करण्यास टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधीत आपली व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५१ ते ६० व भारतीय दंड संहिता १८६० चे कलम १८८ तसेच साथरोग कायदा १८९७ अन्वये दंडनीय / कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील.

जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी नांदेड जिल्हा

स्वा/-
(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड

प्रतिलिपी:

१. मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. सहसंचालक, कृषि, लातूर
३. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नांदेड.
४. कृषि विकास अधिकारी, जि.प. नांदेड.
५. सर्व उपविभागीय अधिकारी, नांदेड जिल्हा.
६. सर्व तहसिलदार, नांदेड जिल्हा.
७. सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद / नगरपंचायत नांदेड जिलहा.

(डॉ.विपीन इटनकर)भा.प्र.से.
जिल्हादंडाधिकारी नांदेड